# ग्रामस्थांची सनद (CITIZEN CHARTER)

## नागरिकांची आरोग्य हक्क सनद

हा दवाखाना आपला आहे. तेथे आपल्याला खालील प्रकारच्या आरोग्य सेवा देण्यास आम्ही वचनबद्ध आहोत.

- कुठल्याही रूग्णाला आरोग्य सेवा नाकारली जाणार नाही. खाजगी डॉक्टरांकडे किंवा दवाखान्यात पाठविले जाणार नाही किंवा या दवाखान्याच्या डॉक्टरांच्या खाजगी दवाखान्यात शुल्क भरून आरोग्य सेवा घेण्यासाठी पाठविले जाणार नाही.
- उपचारांसाठी औषध या दवाखान्यातून मोफत दिली जातील. मुदत संपलेली औषधे दिली जाणार नाहीत. बाहेरून औषधे खरेदी करण्यासाठी सांगितले जाणार नाही.
- सर्व रूग्णांना, विशेषतः गरीब, निरक्षर रूग्णांना आदराची वागणुक दिली जाईल. उपचाराबद्दल सविस्तर माहिती दिली जाईल. या दवाखान्यात उपलब्ध नसलेलया सेवा अन्यत्र कोणत्या शासकीय रूग्णालयात मिळतील याची माहिती दिली जाईल. गरज भासल्यास पुढील संदर्भ सेवेसाठी पुढे पाठविण्याची व्यवस्था केली जाईल.
- दारिद्र्यरेषेखालील कार्डधारकांना सर्व सेवा मोफत मिळतील. इतरांना रूग्ण कल्याण समितीने ठरविलेल्या दराप्रमाणे सेवा दिल्या जातील.
- एचआयव्ही बाधित रूग्णांना औषध सेवा नाकारली जाणार नाही व त्यांनी डॉक्टरांना दिलेली माहिती गोपनीय ठेवली जाईल.
- सर्व रूग्णांना स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात येईल.
- आपल्या काही सुचना / तक्रारी असल्यास सूचनापेटीत लिहून टाकाव्यात.